सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(३)/२०२२/तेवीस दिनांक : १० एप्रिल, २०२४

**-: प्रसिद्धीपत्रक:-**

**विषय :-** महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा- २०२२
पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या तृतीयपंथी उमेदवारांना शारीरिक चाचणीस बोलाविण्याबाबत

**संदर्भ :-** १) जाहिरात क्रमांक ५३/२०२२ व ३६/२०२३.
२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १३ मार्च, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

उपरोक्त संदर्भिय क्रमांक २ वरील प्रसिध्दीपत्रकान्वये महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा-२०२२ मधील पोलीस उपनिरीक्षक या संवर्गामधील तृतीयपंथी उमेदवारांचा निकाल राखून ठेवून शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या अन्य उमेदवारांचा निकाल जाहीर करण्यात आला होता. तथापि आता मूळ अर्ज क्रमांक ६४४/२०२२ वरील मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्या दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उपस्थित तृतीयपंथी उमेदवारांना, प्रस्तुत परीक्षेच्या शारीरिक चाचणीसाठी बोलाविण्यात येत आहे.

२. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे.

३. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जाद्वारे सादर केलेले दावे/अर्हतेच्या आधारेच निवडीसाठी पात्रता आजमाविण्यात येईल.

४. आवश्यक तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. प्रस्तुत परीक्षेचा निकाल विविध मुद्यांसंदर्भात मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

६. प्रस्तुत संवर्गाच्या तृतीयपंथी उमेदवारांची शारीरिक चाचणी दिनांक ०५ एप्रिल, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रसिध्दीपत्रकात नमूद केलेली मानके व गुणांनुसार, दिनांक ०२ मे, २०२४ रोजी पोलीस मुख्यालय, रोडपाली, सेक्टर १७, कळंबोली, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. शारीरिक चाचणीबाबतचे पत्र त्यांच्या प्रोफाईलवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

७. शारीरिक चाचणी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीद्वारे घेण्यात येईल.

**ठिकाण** : नवी मुंबई
**दिनांक** : १० एप्रिल, २०२४

**उपसचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**